नियमीत फौजदारी खटला क्र. **१५६/२०२४**
निशाणी क्र. **९/क**

अभियोग पक्षातर्फे साक्षीदार क्र. **०१** यांची जबानी

मी याद्वारे प्रतिज्ञापूर्वक निवेदन करतो की :

| | | |
|---|---|---|
| माझे संपूर्ण नांव | : | **प्रल्हाद दत्ताराम नटे** |
| वय सुमारे | : | ५४ वर्षे, व्यवसाय : रिक्षाचालक |
| निवासस्थान | : | अलिबाग, ता. अलिबाग, जि. रायगड |

**<u>सरतपासणी सरकारतर्फे विशेष सहाय्यक सरकारी वकील श्रीमती एस्. एम्. छापेकर यांचेमार्फत</u>** :

सन २०२४ मध्ये माझ्या घरात मी, माझी पत्नी व एक मुलगा असे होतो. माझी पत्नी घरकाम करत होती व ती रुपये १५,०००/— दर महिना कमवत होती. ती कामाकरीता घराशेजारील सोसायटीमध्ये जात होती.

०२. दि. २१/०९/२०२४ रोजी मला फोन आला की माझ्या पत्नीचा अपघात झाला आहे. माझ्या पत्नीचा अपघात गोकुळेश्वर येथे झालेला होता. मला समजले की, एका बाईकवाल्याने भरधाव वेगात माझ्या पत्नीला जोरदार धडक दिली होती. त्यानंतर मी घटनास्थळी गेलो. त्यावेळी मला तेथे कोणीही दिसून आले नाही. घटनास्थळी एक बाईक एम् एच् ०६ सी एफ् ७४३० अशी उभी होती. त्यानंतर मी सिव्हील हॉस्पीटल, अलिबाग येथे गेलो. सीटी हॉस्पीटलमधून माझ्या पत्नीला एम्.जी.एम्. हॉस्पीटलला नेण्यास सांगितले.

०३. अपघातात माझ्या पत्नीच्या मेंदूला मार लागला होता. सिव्हील हॉस्पीटल येथून माझ्या पत्नीला एम्.जी.एम्. हॉस्पीटलला नेले. एम्.जी.एम्. हॉस्पीटलला नेताना माझ्या पत्नीचा मृत्यू झाला. त्यानंतर आम्ही पुन्हा सिव्हील

हॉस्पीटल, अलिबाग येथे आलो. सिव्हील हॉस्पीटल येथे माझ्या पत्नीचे पोस्ट मार्टम करण्यात आले. त्यानंतर मी फिर्याद दिली.

०४. आता मला दाखवण्यात आलेली फिर्याद तिच आहे. त्यातील मजकूर बरोबर आहे. त्यावर माझी सही आहे. त्यास **पी–१ (निशाणी क्र.१०)** देण्यात येते. आता मला दाखवण्यात आलेली छापील फिर्याद तिच आहे. त्यातील मजकूर बरोबर आहे. त्यावर माझी सही आहे. त्यास **पी–२ (निशाणी क्र.११)** देण्यात येते.

०५. त्यानंतर पोलीसांनी मला पोलीस ठाण्यात बोलावले होते. पोलीसांनी पंचनामा पोलीस ठाण्यात केला होता. पोलीसांनी माझ्याकडून काहीही लिहून घेतले नव्हते.

**सरतपास पूर्ण**.

**<u>उलटतपास आरोपीकरीता वकील श्री. अमोल पाटील यांचेमार्फत</u>** :

०६. मी इयत्ता ७ वी पास आहे. मी वेश्वी येथे राहतो व अपघात गोकुळेश्वर येथे झाला होता. हे म्हणणे खरे आहे की, या दोन ठिकाणांमध्ये २ कि.मी. अंतर आहे. हे म्हणणे खरे आहे की, ज्या ठिकाणी अपघात झाला होता तो अलिबाग–मुंबई महामार्ग आहे. हे म्हणणे खरे आहे की, गोकुळेश्वर येथे बस स्टॉप आहे व तिथे शाळेतील मुलांची गर्दी असते.

०७. माझी पत्नी मोबाईल वापरत नव्हती. अनोळखी इसमाने मला फोन केला होता त्याची माहिती मी घेतली नव्हती. हे म्हणणे खरे आहे की, मी घटनास्थळी गेलो त्यावेळी तेथे कोणीच नव्हते. हे म्हणणे खरे आहे की, आरोपी

गाडी घेवून पळून गेला होता. हे म्हणणे खरे आहे की, घटनास्थळी गाडी होती हे सरतपासामध्ये मी चुकीचे सांगितलेले आहे. माझी पत्नी घराच्या बाजूच्या सोसायटीमध्ये घरकाम करत होती. माझी पत्नी हॉटेलमध्ये काम करत नव्हती.

०८.        फिर्याद देताना मी आरोपीचे नाव पोलीसांना सांगितले नव्हते. सी.सी. टी.व्ही. फुटेजमधून मी गाडीचा क्रमांक घेतला हे मी माझ्या फिर्यादीत सांगितले नव्हते. हे म्हणणे खरे आहे की, पंचनाम्यावर सही करण्यासाठी पोलीसांनी मला पोलीस ठाण्यात बोलावले होते. हे म्हणणे खरे आहे की, पोलीसांनी फक्त एकदाच माझा जबाब घेतला होता. हे म्हणणे खरे नाही की, माझ्या पत्नीच्या अपघाताला अनोळखी इसमच जबाबदार आहे. हे म्हणणे खरे नाही की, आरोपीचा व अपघाताचा काहीही संबंध नाही. हे म्हणणे खरे नाही की, मी खोटी साक्ष देत आहे.

उलटतपास पूर्ण.

फेरतपास नाही.

श्रवणोत्तर स्वीकृत

अलिबाग.                                                ( **एम्. बी. अत्तार** )
दिनांक : **०५/०७/२०२५**.                  मुख्य न्यायदंडाधिकारी, रायगड–अलिबाग.

नियमीत फौजदारी खटला क्र. **१५६/२०२४**
निशाणी क्र. **१२/क**

अभियोग पक्षातर्फे साक्षीदार क्र. **०२** यांची जबानी

मी याद्वारे प्रतिज्ञापूर्वक निवेदन करतो की :

| | | |
|---|---|---|
| माझे संपूर्ण नांव | : | **मानसी राजेंद्र नमसोले** |
| वय सुमारे | : | ४८ वर्षे, व्यवसाय : पोलीस पाटील |
| निवासस्थान | : | गोंधळपाडा, ता. अलिबाग, जि. रायगड |

**<u>सरतपासणी सरकारतर्फे विशेष सहा. सरकारी वकील श्रीमती छापेकर यांचेमार्फत</u>** :

दि. २४/०९/२०२४ रोजी पोलीसांनी मला घटनास्थळाच्या पंचनाम्याकरीता गोकुळेश्वर स्टॉपवर बोलावले होते. ज्या ठिकाणी अपघात झाला होता त्या ठिकाणचा पंचनामा करायचा होता. सदरचे ठिकाण हा रस्ता असून त्याच्या पूर्वेला मैत्री चहाचे दुकान आहे. घटनास्थळाचा रस्ता हा दक्षिणोत्तर डांबरी रस्ता असून तो अलिबाग ते पेण व पेण ते अलिबाग असा आहे.

०२. पोलीसांनी सांगितले होते की, पोलीस ठाण्यात गुन्हा दाखल असून घटनास्थळाचा पंचनामा करायचा आहे. पोलीसांनी थोडक्यात सांगितले होते की, मोटर वाहनाचा अपघात झाला होता. फिर्यादी घटनास्थळ दाखवतील असे पोलीसांनी सांगितले होते. फिर्यादीने रस्त्यावरील घटनास्थळ आम्हाला दाखवले व पोलीसांनी पंचनामा तयार केला. आता मला दाखवण्यात आलेला पंचनामा तोच आहे. त्यातील मजकूर बरोबर आहे. त्यावर अनु. क्र. १ वर माझी सही आहे. त्यास **पी–३ (निशाणी क्र.१३)** देण्यात येते. पोलीसांनी घटनास्थळाचा नकाशा काढला होता. घटनास्थळाचा नकाशा पंचनाम्याचा भाग असल्यामुळे त्याला स्वतंत्र निशाणी देण्यात येत नाही. पोलीसांनी घटनास्थळाचे फोटो काढले होते.

**सरतपास पूर्ण**.

**<u>उलटतपास आरोपीकरीता वकील श्री. अमोल पाटील यांचेमार्फत</u>** :

०३. सन २०१६ पासून मी पोलीस पाटील म्हणून कार्यरत आहे. घटना किती तारखेची आहे हे मला माहिती नाही. हे म्हणणे खरे आहे की, ज्या दिवशी पंचनामा केला होता त्याच दिवशी अपघात झाला नव्हता. हे म्हणणे खरे आहे की, घटनास्थळी गाडीचे तुटलेले पार्टस् नव्हते, कोणत्याही खाणाखुणा नव्हत्या. हे म्हणणे खरे आहे की, घटनास्थळी अपघातातील गाडी नव्हती.

०४. हे म्हणणे खरे आहे की, यापूर्वीही मी पंचनाम्यासाठी गेलेले आहे. हे म्हणणे खरे नाही की, पोलीसांनी घटनास्थळ पंचनामा पोलीस ठाण्यात तयार केला होता. हे म्हणणे खरे नाही की, मी पोलीस ठाण्यात पंचनाम्यावर सह्या केलेल्या आहेत. हे म्हणणे खरे नाही की, पोलीसांना मदत करण्यासाठी मी आज रोजी खोटी साक्ष देत आहे. हे म्हणणे खरे आहे की, घटनास्थळ हा रहदारीचा रस्ता आहे.

उलटतपास पूर्ण.

फेरतपास नाही.

श्रवणोत्तर स्वीकृत

अलिबाग. ( **एम्. बी. अत्तार** )
दिनांक : **०५/०७/२०२५**. मुख्य न्यायदंडाधिकारी, रायगड–अलिबाग.

नियमीत फौजदारी खटला क्र. **१५६/२०२४**
निशाणी क्र. **१५/क**

अभियोग पक्षातर्फे साक्षीदार क्र. **०३** यांची जबानी

मी याद्वारे प्रतिज्ञापूर्वक निवेदन करतो की :

| | | |
|---|---|---|
| माझे संपूर्ण नांव | : | **स्वाती सचिन शिगम** |
| वय सुमारे | : | ३८ वर्षे, व्यवसाय : मजूरी |
| निवासस्थान | : | मु. नागाव, कोठारभाट, ता. अलिबाग, जि. रायगड |

**<u>सरतपासणी सरकारतर्फे सहाय्यक सरकारी वकील श्री. पी.एस्. पाटील यांचेमार्फत</u>** :

घटना दि. २१/०९/२०२४ रोजी सकाळी ११.३० वाजता घडली होती. मी मैत्री चहाच्या दुकानावर कामाला असते. सदरचे दुकान गोकुळेश्वर स्टॉपजवळ आहे. त्यावेळी माझी कामाची वेळ सकाळी ९.०० ते सायं. ७.०० अशी होती. त्या दिवशी अपघात झाला होता. मी माझ्या दुकानात बसले होते त्यावेळी दुचाकी वाहनाने एका महिलेला ठोकर मारली होती. ती महिला रस्त्याच्या डाव्या बाजूने उजव्या बाजूकडे जात होती. महिलेला ठोकर मारल्यामुळे ती पडली होती व तिच्या नाकातून रक्त येत होते. अपघात झाल्यानंतर मी त्या ठिकाणी जावून त्या महिलेला पाहिले होते. प्रशांत घरत यांनी त्या महिलेला गाडीत टाकून सिव्हील हॉस्पीटलमध्ये नेले होते. आरोपीला पाहिल्यास मी ओळखू शकणार नाही.

(**साक्षीदार पूर्वी दिलेल्या जबानीपेक्षा विसंगत साक्ष देत असल्याने सरकारी अभियोक्ता यांनी साक्षीदाराचा उलटतपास घेण्याची परवानगी मागितली. परवानगी दिली**.)

**<u>सरतपासणी सरकारतर्फे सहाय्यक सरकारी वकील श्री. पी.एस्. पाटील यांचेमार्फत</u>** :

०२. हे म्हणणे खरे आहे की, आरोपी दोन मिनिटे तेथे हजर होता. हे

म्हणणे खरे आहे की, मी त्यावेळी आरोपीला पाहिले होते. हे म्हणणे खरे आहे की, आरोपी आज रोजी न्यायालयात हजर आहे.

**उलटतपास पूर्ण**.

**<u>उलटतपास आरोपीकरीता वकील श्री. अमोल पाटील यांचेमार्फत</u>** :

०३. हे म्हणणे खरे आहे की, माझ्या दुकानासमोरील रस्ता हा अलिबाग मुंबई हायवे आहे. हे म्हणणे खरे आहे की, सदर रस्ता चोवीस तास रहदारीचा आहे. माझ्या दुकानापासून ते अपघातस्थळ हे २० फुट अंतर असेल. हे म्हणणे खरे आहे की, ती महिला रस्ता क्रॉस करत होती. हे म्हणणे खरे आहे की, अपघात झाल्यावर तेथे लोकांची गर्दी झाली होती. हे म्हणणे खरे नाही की, मी आरोपीला पाहिले नव्हते. हे म्हणणे खरे आहे की, मी जबाब देण्यासाठी गेले होते त्यावेळी पोलीसांनी मला आरोपी दाखवला नव्हता. हे म्हणणे खरे नाही की, मी कोणताही अपघात पाहिलेला नाही. हे म्हणणे खरे नाही की, मी आरोपीला पाहिले हे मी खोटे सांगत आहे. हे म्हणणे खरे नाही की, मी खोटी साक्ष देत आहे.

उलटतपास पूर्ण.

फेरतपास नाही.

श्रवणोत्तर स्वीकृत

अलिबाग. ( **एम्. बी. अत्तार** )
दिनांक : **१६/०९/२०२५**. मुख्य न्यायदंडाधिकारी, रायगड–अलिबाग.

नियमीत फौजदारी खटला क्र. **१५६/२०२४**
निशाणी क्र. **१९/क**

अभियोग पक्षातर्फे साक्षीदार क्र. **०४** यांची जबानी

मी याद्वारे प्रतिज्ञापूर्वक निवेदन करतो की :

| | | |
|---|---|---|
| माझे संपूर्ण नांव | : | **प्रशांत हरिश्चंद्र घरत** |
| वय सुमारे | : | ३९ वर्षे, व्यवसाय : नोकरी |
| निवासस्थान | : | मु. नवेदर बेली, पो. कुरुळ, ता. अलिबाग |

**<u>सरतपासणी सरकारतर्फे सहाय्यक सरकारी वकील श्री. पी.एस्. पाटील यांचेमार्फत</u>** :

०१. घटना दि. २१/०९/२०२४ रोजी सकाळी ११:३० वाजताच्या सुमारास अलिबाग–पेण रस्त्यावर गोकुळेश्वर स्टॉपजवळ स्वामीराज आईसक्रिम पार्लरच्या समोर घडली. पेणकडून अलिबागकडे जाणाऱ्या टू व्हीलर चालकाने एका महिलेला ठोकर मारली. मी लगेच मदतीसाठी गेलो व त्या महिलेला माझ्या चारचाकी वाहनातून घेवून हॉस्पीटलकडे निघालो. त्यावेळी मी ज्या टू व्हीलर चालकाने त्या महिलेला ठोकले त्याला हॉस्पीटलमध्ये सोबत येण्यास सांगितले. आम्ही हॉस्पीटलमध्ये पोहोचलो तरी तो इसम हॉस्पीटलमध्ये आला नाही.

०२. तिथे गेल्यानंतर त्या महिलेला अपघात विभागात दाखल केले. मला डॉक्टरांनी त्या महिलेचे नाव विचारले. मी त्या महिलेची पर्स सोबत घेवून गेलो होतो. त्या पर्समध्ये महिलेचा आधार कार्ड मिळाला. त्यावरुन त्या महिलेचे नाव समजले. तिचे नाव प्रज्ञा नटे असे होते. त्या आधारकार्डवर मोबाईल क्रमांक नमूद होता. त्या क्रमांकावर मी कॉल केला. तो कॉल त्या महिलेच्या पतीने उचलला. त्यांना मी घटनेबाबतची माहिती दिली. ते लगेच सिव्हील हॉस्पीटलमध्ये रवाना झाले. तिथे त्या महिलेवर उपचार करण्यात आले.

०३. काही दिवसांनी पोलीसांकडून मला समजले की, ती महिला मयत झाली. ज्या टू व्हीलर चालकाने अपघात केला होता तो आज न्यायालयात हजर आहे.

**सरतपास पूर्ण**.

**<u>उलटतपास आरोपीकरीता वकील श्री. अमोल पाटील यांचेमार्फत</u>** :

०४. घटनास्थळी माझ्या पत्नीचे आईसक्रिमचे दुकान आहे. अपघात झाल्यानंतर मी तात्काळ पोलीसांना फोन केला नव्हता. मी त्या टू व्हीलर चालकाचे नाव त्यावेळी त्याला विचारले नव्हते. मी पोलीसांना जबाब देताना गाडीचे वर्णन, तिचा क्रमांक, कंपनीचे नाव इत्यादी सांगितले नव्हते. हे म्हणणे खरे आहे की, अपघातस्थळ हे अलिबाग–मुंबई हायवे आहे. हे म्हणणे खरे आहे की, सदरचा रस्ता हा रहदारीचा आहे. हे म्हणणे खरे आहे की, घटनास्थळाच्या जवळ पी.एन.पी. कॉलेज आहे. हे म्हणणे खरे आहे की, घटनास्थळाजवळ बस स्टॉप आहे. हे म्हणणे खरे आहे की, घटनास्थळी झेब्रा क्रॉसिंगच्या पट्ट्या नाहीत. हे म्हणणे खरे आहे की, रस्ता पार करण्यासाठी तेथे फलक नाही. अपघात घडल्यानंतर लगेच मी तेथे गेलो. हे म्हणणे खरे आहे की, मी तेथे पोहोचल्यानंतर तेथे गर्दी जमली होती.

०५. हे म्हणणे खरे आहे की, मी त्यावेळी आरोपीला ताब्यात घेतले नव्हते. हे मला माहीत नाही की, पोलीस हॉस्पीटलमध्ये आले होते की घटनास्थळी गेले होते.

०६. हे म्हणणे खरे नाही की, आरोपीचा अपघाताशी कोणताही संबंध नाही. हे म्हणणे खरे नाही की, आरोपी घटनास्थळी नव्हता. हे म्हणणे खरे नाही की, घटनेत असणारी गाडी आरोपीची नव्हती. हे म्हणणे खरे नाही की, तथाकथीत अपघात महिलेच्या निष्काळजीपणामुळे झालेला आहे.

०७. हे म्हणणे खरे आहे की, मी ज्या गाडीमध्ये महिलेला नेले त्या गाडीचा क्रमांक पोलीसांना जबाब देताना सांगितला नव्हता. महिलेला दुखापत झाली होती व रक्त येत होते. गाडीमध्ये रक्त पडले नव्हते. हे म्हणणे खरे नाही की, आज रोजी खोटी साक्ष देत आहे.

उलटतपास पूर्ण.

फेरतपास नाही.

श्रवणोत्तर स्वीकृत

अलिबाग. ( **एम्. बी. अत्तार** )
दिनांक : **१५/१२/२०२५**. मुख्य न्यायदंडाधिकारी, रायगड—अलिबाग.

नियमीत फौजदारी खटला क्र. **१५६/२०२४**
निशाणी क्र. **२१/क**

अभियोग पक्षातर्फे साक्षीदार क्र. **०५** यांची जबानी

मी याद्वारे प्रतिज्ञापूर्वक निवेदन करतो की :

माझे संपूर्ण नांव : **रमेश बाळाराम सोनकर**
वय सुमारे : ५७ वर्षे, व्यवसाय : पोलीस उपनिरीक्षक
सध्या नेमणूक : नागोठणे पोलीस ठाणे

**<u>सरतपासणी सरकारतर्फे सहाय्यक सरकारी वकील श्री. पी.एस्. पाटील यांचेमार्फत</u>** :

०१. दि. २१/०९/२०२४ रोजी मी अलिबाग पोलीस ठाणे येथे सहा. पोलीस उपनिरीक्षक म्हणून कार्यरत होतो. दि. २१/०९/२०२४ रोजी प्रज्ञा प्रल्हाद नटे यांना गोकुळेश्वर फाटा, अलिबाग येथे अपघात झाला होता. तेव्हा त्यांना सिव्हील हॉस्पीटल, अलिबाग येथे दाखल करण्यात आले होते. तेथून त्यांना उपचारासाठी मुंबई येथे हलविण्यात आले परंतु ॲम्ब्युलन्समध्ये तब्येत बिघडल्यामुळे त्यांना पुन्हा सिव्हील हॉस्पीटल, अलिबाग येथे आणण्यात आले. तेथे त्या मयत झाल्या. प्रल्हाद नटे यांनी अपघात मृत्यूची खबर दिली. सदरच्या खबरेवरुन अलिबाग पोलीस ठाणे येथे गुन्हा रजि. क्र. १८६/२०२४ नोंदवण्यात आला.

०२. तपास वरिष्ठांच्या आदेशाने माझ्याकडे देण्यात आला. तपासकाम माझ्याकडे आल्यानंतर मी कागदपत्रांचे अवलोकन केले व आरोपीचा शोध घेतला व त्याला मोटर वाहन कायदा कलम २०९ प्रमाणे नोटीसची बजावणी केली. आता मला दाखवण्यात आलेली नोटीस तिच आहे. त्यातील मजकूर बरोबर आहे. त्यावर माझी व आरोपीची सही आहे. त्यास **पी—४ (निशाणी क्र.२२)** देण्यात येते.

०३. त्यानंतर दि. २२/०९/२०२४ रोजी आरोपी रुपेश म्हामुलकर याची

अटकपूर्व वैद्यकीय तपासणी करुन त्याला अटक करुन न्यायालयात रिमांड रिपोर्टसह हजर केले. साक्षीदार प्रशांत घरत, स्वाती शिगम यांचे टिपण नोंदवले व गुन्ह्याकामी समाविष्ट केले. दि. २४/०९/२०२४ रोजी अपघात मृत्यूची खबर देणार फिर्यादी प्रल्हाद नटे यांचा पुरवणी जबाब नोंदवला. त्यांनी सांगितल्याप्रमाणे त्यांना प्रत्यक्षदर्शी साक्षीदार यांनी घटनास्थळ दाखवले ते त्यांनी आम्हाला दाखवल्यानंतर दोन पंचांसमक्ष घटनास्थळाचा पंचनामा केला. आता मला दाखवण्यात आलेला निशाणी क्र. १३ कडील पंचनामा तोच आहे. त्यातील मजकूर बरोबर आहे. त्यावर माझी व दोन पंचांच्या सह्या आहेत. मी घटनास्थळाचा हातनकाशा काढला. आता मला दाखवण्यात आलेला घटनास्थळाचा हातनकाशा तोच आहे. त्यातील मजकूर बरोबर आहे. त्यावर माझी सही आहे. त्यास **पी—५ (निशाणी क्र.२३)** देण्यात येते. मी माझ्या मोबाईलमधून घटनास्थळाचा एक फोटो काढला. तसेच अपघातातील स्कूटरचे एकूण चार फोटो काढले व दोषारोपपत्रात समाविष्ट केले. आता मला दाखवण्यात आलेले फोटो तेच आहेत. त्यास **पी—६ (निशाणी क्र.२४/१** ते **२४/५)** देण्यात येते. सदर फोटोंच्या अनुषंगाने मी भारतीय साक्ष अधिनियम कलम ६३(४)(क) प्रमाणे प्रमाणपत्र दिले. आता मला दाखवण्यात आलेले ते प्रमाणपत्र तेच आहे. त्यातील मजकूर बरोबर आहे. त्यावर माझी सही आहे. त्यास **पी—७ (निशाणी क्र.२५)** देण्यात येते.

०४. स्कूटर केतन दत्ताराम सलामत यांच्या मालकीची असल्याचे निष्पन्न झाल्याने त्यांचे टिपण नोंदवले. दि. २५/०९/२०२४ रोजी आर.टी.ओ., पेण यांना स्कूटरची तपासणी होण्याबाबत फॉर्म पाठविला. आर.टी.ओ., पेण यांच्याकडून प्राप्त झालेला अहवाल दोषारोपपत्रात समाविष्ट केला.

०५. त्यानंतर दि. ०२/१०/२०२४ रोजी स्कूटरवर मागे बसलेला पार्थ

पवार यांचे टिपण नोंदवले व ते कागदपत्रांत समाविष्ट केले. त्यानंतर तपासकामी तपासात आरोपीकडे लायसन नसल्याचे निष्पन्न झाल्याने दि. ०५/१०/२०२४ रोजी न्यायालयास मोटर वाहन कायदा कलम ३/१८१ हे वाढीव कलम लावण्याबाबत पत्र दिले. आता मला दाखवण्यात आलेले पत्र तेच आहे. त्यातील मजकूर बरोबर आहे. त्यावर माझी सही आहे. त्यास **पी–८ (निशाणी क्र.२६)** देण्यात येते.

०६. वैद्यकीय अधिकारी, जिल्हा सामान्य रुग्णालय, अलिबाग यांच्याकडून अकस्मात मृत्यूची नोंद व पी.एम. रिपोर्ट व इतर कागदपत्र मिळण्याबाबत रिपोर्ट दिला. आता मला दाखवण्यात आलेले पत्र तेच आहे. त्यातील मजकूर बरोबर आहे. त्यावर माझी सही आहे. त्यास **पी–९ (निशाणी क्र.२७)** देण्यात येते. त्यानंतर आरोपीचे आधारकार्ड, मयत महिलेचे ओळखपत्र गुन्ह्याच्या कामी हस्तगत करुन दाखल केले. माझ्या तपासात आरोपीने गुन्हा केल्याचे निष्पन्न झाल्याने त्याच्याविरुद्ध न्यायालयात दोषारोपपत्र सादर केले. आरोपी आज रोजी न्यायालयात हजर आहे.

**सरतपास पूर्ण**.

**उलटतपास आरोपीकरीता वकील श्री. अमोल पाटील यांचेमार्फत** :

आरोपीतर्फे वकीलांच्या निशाणी क्र. २८ कडील अर्जावरील आदेशावरुन **उलटतपास** पुढील तारखेपर्यंत **तहकूब** करण्यात आला.

श्रवणोत्तर स्वीकृत

अलिबाग. **( एम्. बी. अत्तार )**
दिनांक : **२३/०३/२०२६**. मुख्य न्यायदंडाधिकारी, रायगड–अलिबाग.